करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. ११७

## महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२८/०३/२०२०

---

**वाचले**:-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५.

२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०.

४) साथ रोग अधिनियम १८९७.

५) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२२/०३/२०२०.

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अधिसूचना क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, Dated :-२३ March २०२० या मधील मुद्दा क्र.७ व ९.

७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अधिसूचना क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, Dated :-२५ March २०२०.

८) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२४/०३/२०२०. **(करोना २०२०/ सूचना/आदेश क्र.९८ व १०७)**

९) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२५/०३/२०२०. **(करोना २०२०/ सूचना/आदेश क्र.१११ व ११४)**

---

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

उपोद्घात क्र.५ अन्वये, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून औद्योगिक, खाजगी आस्थापनांमधील होणारी गर्दी टाळणे आवश्यक असल्याने रायगड जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी. व सॉफ्टवेअर कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरविणाऱ्या आस्थापना दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत पुर्णपणे बंद करण्यात आलेल्या आहेत.

सदर आदेशामधून जीवनावश्यक वस्तु, औषधे (Medicine) तयार करणाऱ्या आस्थापना, औषधे निर्माण करण्यासाठी लागणारा कच्चा माल (Raw materials) निर्माण करणाऱ्या व त्यांची उपउत्पादने (By products) निर्माण करणाऱ्या, औषधाची पॅकेजिंग करणाऱ्या आस्थापना, सदर पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या वस्तूंची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, पुरवठा साखळीतील सेवा, वैद्यकीय संसाधने निर्माण करणाऱ्या व त्यांच्या पॅकेजिंगसाठीची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, औषधे पुरवठा करणारे वितरक (Distributors), औषधांची वाहतूक करणारी वाहने (Transportation) ची आस्थापना या कंपन्याच्या मालवाहतूक सेवा व कर्मचारी वर्गाच्या बसेस व इतर वाहने सुरु राहतील. तसेच ज्या कंपनीची उत्पादन प्रक्रीया अखंडीत चालू राहणे (Continuous Processing Industry) अनिवार्य आहे, अशी आस्थापना कमीत कमी कर्मचारी वर्ग (कमाल

५०%) यांचेसह चालू ठेवावी या कंपन्यांच्या माल वाहतूक सेवा व कर्मचारी वर्गाच्या बसेसना सुट देण्यात आलेली आहे. उपरोक्त संदर्भ आदेश क्र.८ व ९ अन्वये यापुर्वी २४२ कंपन्यांना या कार्यालयामार्फत सुट देऊन त्यांचे कामगार /अधिकारी यांना ने-आण करण्याकामी तसेच कच्चा माल व पक्का मालाची वाहतूक करण्याकामी सूट देण्यात आली होती.

त्यानंतर प्राप्त विविध कंपन्याचे विनंती अर्ज जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीसमोर सादर करण्यात आले. सदर समितीच्या बैठकीमध्ये उपोद्घातांतील अ.क्र.७ नुसार ज्या कंपन्या Non Essential असल्याबाबत विस्तृत चर्चा झाली. जिल्हास्तरीय उद्योग समितीने घेतलेल्या निर्णयानुसार खालील कंपन्या हया Non Essential Services मध्ये येत असल्यामुळे त्यांची विनंती अमान्य करण्यात येऊन त्यांनी आपली कंपनी बंद ठेवण्याची आहे व बंदच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये या दृष्टीने योग्य ते सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यांची व्यवस्था करण्याची आहे.

| Sl. | Name of Factory | Location |
|---|---|---|
| 1 | Gandhar Oil refinery India Ltd | Taloja |
| 2 | Lona Industries Ltd. | Panvel |
| 3 | M/s Dorf Ketal Chemicals (India) Pvt Ltd. | Taloja |
| 4 | Maharashtra Seamless Ltd. | Roha |
| 5 | Maharashtra Seamless Ltd. | Mangoan |
| 6 | Nidar Utilities Panvel LLP | Panvel |
| 7 | The Fertiliser Association Of India | Taloja |
| 8 | Time Mauser Industries Pvt Ltd. | Pen |
| 9 | Uttam Galva Steels Ltd. | Khalapur |
| 10 | Vedant Dyestuffs Intermediates Pvt. Ltd | Panvel |

त्याच बरोबर उपोद्घांतातील अ.क्र.८ नुसार कोरोना २०२०/ सुचना /आदेश क्र.९८ मधील अ.क्र. ७१) JSW Cement Dolvi अ.क्र.५२) Galaxy Surfactants Ltd Pawne, Navi Mumbai अ.क्र.२५) Champion Steel Industries Ltd, Taloja MIDC यांना अनावधानाने परवानगी देण्यात आलेल्या यादीत समाविष्ट केले गेले होते. सबब, ती नावे यादीतून वगळणे योग्य होईल. सबब ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे. या कंपन्यांनी बंदच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये या दृष्टीने योग्य ते सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यांची व्यवस्था करण्याची आहे.

(अनिल पारस्कर)
**जिल्हा पोलिस अधिक्षक**
**रायगड**

( निधी चौधरी )
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी रायगड-अलिबाग RAIGAD-ALIBAG

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई
प्रत :- पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग
प्रत :- पोलीस उपायुक्त, झोन-२, पनवेल